माण देशी
बँक

रजि. नं. एस.ए.टी. / माण/बी.एन.के./ओ./११९, सन १९९६
दि. ३१/१०/९६, एल.एन.एम.ए.एच.यु.बी.डी. १३६१ पी.

# माण देशी

## महिला सहकारी बँक लि., म्हसवड

### ता. माण, जि. सातारा

**१८ वा वार्षिक अहवाल सन २०१४-२०१५**

**ऑडीट वर्ग 'अ'**



# संचालक मंडळ (सन २०११-१२ ते २०१६-१७)

माण देशी बँक


श्रीमती चेतना वि. सिन्हा
अध्यक्षा (म्हसवड)


सौ. गीता ग. रसाळ
उपाध्यक्षा (म्हसवड)


सौ. मंजुषा रा. सुर्यवंशी
संचालिका (म्हसवड)


सौ. निर्मला म. मोरे
संचालिका (गोंदवले खुर्द)


सौ. स्वाती नि. चिंचकर
संचालिका (म्हसवड)


सौ. ललीता सा. पोळ
संचालिका (देवापूर)


सौ. संगिता म. काटकर
संचालिका (कुकुडवाड)


सौ. वर्षा ल. खाडे
संचालिका (पळशी)


सौ. राणी सं. गोरड
संचालिका (दिडवाघवाडी)


सौ. विमल दि. घुटुकडे
संचालिका (विरळी)


सौ.राजश्री नि. दोशी
संचालिका (म्हसवड)


सौ. वनिता जा. पिसे
संचालिका (म्हसवड)


सौ. शारदा बा. मदने
संचालिका (बनगरवाडी)


सौ. सिताबाई आ. पुकळे
संचालिका (पुकळेवाडी)


सौ. रेखा अ कट्टे
संचालिका (गोंदवले बु.)


सौ. नूतन प्र. शेटे
संचालिका (वडूज)


सौ. कांचन कि. शिंदे
संचालिका (बोथे)


सौ. अरूणा अ. सावंत
संचालिका (क्षेत्र माहुली)


श्री. विजयकुमार केसकर
तज्ञ संचालक (गोंदवले बु।।)


सौ. रेखा सु. कुलकर्णी
मुख्य कार्यकारी अधिकारी



दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बॅक्स् फेडरेशन लि. तर्फे ''२०१३-१४ सालचा सर्वोत्कृष्ट बँक'' असा प्रथम पुरस्कार देवून माण देशी बँकेस गौरविण्यात आले, त्याप्रसंगी मा. विद्याधर अनास्कर-अध्यक्ष दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि. व पुरस्कार स्विकारताना माण देशी बँकेच्या संचालिका

आयसीआयसीआय बँक व सीएनबीसी टि.व्ही. १८ यांच्या तर्फे आयोजित "The Emerging India Award 2014" हा पुरस्कार भारतातील उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून ज्यांनी स्वतःची नवी ओळख निर्माण केली अशा उद्योजकांना देण्यात आला. हा पुरस्कार मा. श्री. के. व्ही. कामथ, कार्यकारी अध्यक्ष आयसीआयसीआय बँक व मा. शिरीन भान व्यवस्थापकीय संपादक, सीएनबीसी यांच्या हस्ते स्विकारताना माण देशी बँकेच्या संचालिका सौ. शारदा मदने व अध्यक्षा श्रीमती चेतना सिन्हा





दि. १७ जुलै २०१५ रोजी ''नाबार्ड'', पुणे या संस्थेमार्फत माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड मधील गट कर्ज वाटप या योजनेमधील ''विजय गटाचा'' सत्कार सहकार आयुक्त मा. श्री. चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते करण्यात आला. समवेत मा. श्री. उमेश सारंगी-माजी अध्यक्ष, सर्वोच्च कृषी बँक नाबार्ड, मा. श्री. यु. एस. साहा-मुख्य महाव्यवस्थापक नाबार्ड, त्याप्रसंगीचे छायाचित्र




''बँकिंग फायनान्स सर्व्हिसेस अॅन्ड इन्शुरन्स'' (बीएफएसआय) आयोजित शिखर परिषदेत ग्रामीण बँकिंग क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल श्रीमती चेतना सिन्हा यांना सन्मानित करण्यात आले त्याप्रसंगी सहभागी झालेले डॉ. एस. के. शर्मा - मुख्य सचिव, सहकार विभाग महाराष्ट्र राज्य, मा. श्री. एम. एन. स्मार्ट - मुख्य कार्यकारी अधिकारी असोसिएटेड को. बँक लि., मा. श्री. संजय विलास-अॅक्सिस बँक अधिकारी, मा. श्री. नरेंद्र बेहेरे - मुख्य कार्यकारी अधिकारी दि ग्रेटर बॉम्बे को ऑपरेटिव्ह बँक लि.

दि. १७ जुलै २०१५ रोज नाबार्ड पुणे, या संस्थेमार्फत सहकार आयुक्त मा. श्री. चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते माण देशी बँकेस गौरविण्यात आले त्याप्रसंगी मा. श्री. उमेश सारंगी माजी अध्यक्ष सर्वोच्च कृषी बँक नाबार्ड, मा. श्री. यु. एस. सहा-मुख्य महाव्यवस्थापक नाबार्ड समवेत सौ. रेखा कुलकर्णी मुख्य कार्यकारी अधिकारी माण देशी बँक





यु.टी.आय. पेन्शन योजनेचे अध्यक्ष मा. श्री. देबाशिश मोहंती, वरिष्ठ कार्यकारी उपाध्यक्ष आणि मार्केटींग ऑफिसर यु.टी.आय मा. श्री. गौरव सुरी यांनी माण देशी बँकेस भेट देऊन बँकेच्या कार्याची माहिती घेतली त्याप्रसंगी श्रीमती चेतना सिन्हा, उपाध्यक्षा सौ. गीता रसाळ व संचालिका सौ. वनिता पिसे

# १८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

बँकेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, आपल्या बँकेची अठरावी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दि. ११।८।२०१५ रोजी दुपारी १२ वाजता माण देशी महिला सह. बँक लि. म्हसवड येथे खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी होणार आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.

## • सभेपुढील विषय •

१. दिनांक ११-८-२०१४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे.
२. दि. ३१ मार्च २०१५ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
३. सन २०१४-२०१५ मधील नफ्याची मा. संचालक मंडळाने सुचविलेनुसार नफा वाटणीस मंजुरी देणे.
४. सन २०१४-२०१५ चे शासकिय लेखापरिक्षण अहवाल वाचून नोंद घेणे.
५. सन २०१४-२०१५ चे शासकिय लेखापरिक्षण दोषदुरुस्ती अहवाल वाचून नोंद घेणे.
६. सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाकरिता वैधानिक हिशोब तपासणीसांची नेमणुक करणे व त्याचे मानधन ठरविणे.
७. सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाकरीता अंतर्गत हिशोब तपासणीसांची नेमणुक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
८. सन २०१५-२०१६ सालाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे व सन २०१४- २०१५ सालच्या अंदाजपत्रकापेक्षा ज्या बाबीवर अधिक खर्च झाला आहे. त्यास मान्यता देणे.
९. संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत चर्चा करणे.
१०. पोट नियम दुरुस्तीबाबत चर्चा करणे.
११. स्टाफिंग पॅटर्नला मंजूरी देण्याबात विचार करणे.
१२. शाखा विस्तारास मान्यता देणे .
१३. सभासंदासाठी बँकिंग शिक्षण व प्रशिक्षणाबाबत चर्चा करणे.
१४. बँकेसाठी जागा खरेदी करणेबाबत विचार करणे.
१५. माण देशी महिला सहकारी बँक व माण देशी फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविलेल्या उपक्रमांची चर्चा करुन नोंद घेणे.
१६. वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.
१७. मा. अध्यक्षांच्या पुर्वपरवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर विचार विनिमय करणे.

संचालक मंडळाच्या हुकुमावरुन
**माण देशी महिला सह. बँक लि. म्हसवड**

दि. २६/०७/२०१५
सभेचे स्थळ :- माण देशी फौंडेशन,नविन इमारत,
सातारा-पंढरपूर रोड,भागवत एजन्सीज शेजारी म्हसवड
वेळ: दुपारी १२ वा.

**सौ. रेखा सु. कुलकर्णी**
मुख्य कार्यकारी अधिकारी
माण देशी महिला सह. बँक लि. म्हसवड

विशेष सुचना :-
१. गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सभा घेणेत येईल.
२. सभेच्या वेळी विचारावयाचे प्रश्न आणि सुचना दि. ३/०८/२०१५ पूर्वी बँकेच्या कार्यालयात मिळतील अशा रितीने पाठवाव्यात. ४. बँकेची वेबसाईट www.manndeshibank.com वर संचालक मंडळाचा अहवाल, ताळेबंद व नफा - तोटा पत्रक प्रसिद्ध केला आहे.

**सन्माननीय सभासद भगिनींनो,**

माणदेशी महिला सहकारी बँकेने १९ व्या वर्षात पदार्पण केले आहे. गेल्या अठरा वर्षाचा माण देशीचा इतिहास उलगडला तर माण देशसारख्या दुष्काळी प्रदेशातील पिडित, उपेक्षित कष्टकरी महिलांसाठी ग्रामीण महीला बँक, व्यवसाय शाळा फिरती व्यवसाय शाळा, रेडिओ स्टेशन, ग्रामीण मुला-मुलींसाठी माण देशी चॅम्पियन क्रिडा संकुल सुरु करुन माण देशीने ऐतिहासिक पायंडा रचला आहे. काळाच्या बरोबर बँकिंग बदलले. ग्राहकांना घरुन बँकिंग करणे, केव्हाही कोठुनही बँकिंग,ऑनलाईन बँकिंग करता यावे यासाठी माण देशी बँकेने कोअर बँकिंग प्रणाली अवलंबिली. आनंदाची गोष्ट म्हणजे, खातेदारांच्या सोयीसाठी आरटीजीएस, एनईएफटी, मोबाईल बँकिंग, रुपे कार्डची (एटीएम)सुविधा बँक यावर्षी उपलब्ध करुन देत आहे.

माण देशी बँकेने निरनिराळ्या बचत व कर्जाच्या नाविन्यपूर्ण योजना आपल्या ग्राहकांसाठी तयार केल्या आहेत. उदा. भाजीपाला विकणाऱ्या महिलांना सावलीसाठी छत्री देणे जेणेकरुन त्यांच्या आरोग्याचे रक्षण होवून त्या जास्तीत जास्त फायदा कमवू शकतील. बचतीच्या घरपोच सुविधा देत आहे. बँकेने धान्य साठविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कणग्यांचे कमीत कमी रु. ६०० /- पासून पुढे कर्ज स्वरुपात वाटप केले. माण देशी बँक शेळ्या खरेदीसाठी कर्ज देते, गोट फार्मसाठी नाही, बँक महिलांना म्हैशीसाठी कर्ज देते डेअरीसाठी नाही, बँक कोंबड्यांसाठी कर्ज देते पोल्ट्रीसाठी नाही, तसेच गाढव खरेदीसाठी कर्ज देते. कारण बँक महिलांना फक्त कर्ज उपलब्ध करुन देत नाही तर महिलांना उत्पन्न त्यांच्या ताब्यात रहावे आणि ते खर्च करण्याची निर्णयशक्ती महिलांना देते. माण देशी बँक जर महिलेच्या नावावर प्रॉपर्टी असेल तर कर्जाच्या व्याजात पण सूट देते म्हणजे महिलांना प्रॉपर्टीचा हिस्सा देण्यात त्यांच्या पतींना प्रोत्सहान मिळेल. नवलाची गोष्ट म्हणजे माण देशीने म्हसवड नगरपालिका व अहिंसा नागरी पतसंस्थेसोबत भृणहत्या रोखणेसाठी ''सुकन्या योजना'' सुरु केलेली आहे. या योजनेअंतर्गत म्हसवड नगरपरिषद हद्दीत जन्मास आलेल्या मुलींच्या नावे रु. २०,०००/- ची मुदत ठेव पावती करण्यात येत आहे. सदर मुलगी अठरावर्षाची झाल्यावर तीला त्याचा लाभ मिळून ती लखपती होणार आहे. आठवड्या बाजारात व्यवसाय करणाऱ्या महिलांना जागेवर कर्ज उपलब्ध करुन दिल्यामुळे त्या लाखांमध्ये उलाढाल करु लागल्यात आणि त्यांच्यातील आत्मविश्वास बळावला आहे.

महिलांना खऱ्या अर्थाने सबल बनवायचे असेल तर त्यांना भांडवलाबरोबर व्यवसायिक प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. महिलांची ही गरज ओळखून माण देशीने व्यवसाय शाळा व फिरती व्यवसाय शाळा काढली. सध्या आधुनिक तंत्रज्ञान जसे संगणक, टीव्ही, मोबाईल रेडिओ चा वापर करुन जनतेला आर्थिक व व्यावसायिक प्रशिक्षण त्यांच्या दारी देण्याचे कार्य माण देशी करीत आहे.

महिला उद्योजिका घडाव्यात म्हणून माण देशी उद्योगिनी मार्फत व्यवसाय प्रशिक्षण देवून सोबत यशस्वीरित्या व्यवसाय करणाऱ्या महिलांना माण देशी उद्योजिका पुरस्काराने माण देशीतर्फे सन्मानित व प्रोत्साहीत करण्यात येते. महिलांना आपली शिक्षणाची अपुरी राहिलेली इच्छा पुर्ण करता यावी म्हणून यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठाचे अभ्यास केंद्र सुरु करण्यात आले. माण देशी हा कायम दुष्काळी भाग असल्यामुळे उन्हाळ्यामध्ये पिण्याच्या व शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होतो याचा विचार करुन सिमेंट बंधारे बांधले.

या वर्षाची विशेषत: म्हणजे तरुण मुलींसाठी माण देशीने एक नव्या उपक्रमाची सुरुवात केली ती म्हणजे ''मुलींसाठी बँकिंग कार्यशाळा'' त्याचा उद्देश हाच की मुली व महिलांना बँकिंग व्यवहारांची माहिती व्हावी जेणेकरुन बँकिंग सेवासुविधांचा लाभ त्यांच्याकडून घेतला जाईल.

माण देशी महिला बँक आपली संलग्न संस्था माण देशी फाऊंडेशनच्या सहकार्याने राबवित असलेल्या विविध उपक्रमांच्या प्रेरणा या माण देशीच्या सभासद महिला आहेत. माण देशीने जे काही उपक्रम आखले त्या आपल्या महिलांच्या अनुभवातून व गरजेनुसार तसेच माण देशीने लातूर आणि रत्नागिरी जिल्हयात आपल्या कार्याचा विस्तारही वाढवला आहे.

कौतुकाची बाब म्हणजे माण देशीच्या रोल मॉडेल सौ. सुरेखा काळेल व सौ. कांचन भगत यांनी ''जागृती यात्रेसोबत'' संपूर्ण भारतभर सफर केली व आज त्या शेकडो महिलांसाठी आदर्श आहेत. अशा हजारो माण देशी रोल मॉडेल्स तयार करण्याचे उद्दिष्ट माण देशी उराशी बाळगत आहे.

आपली स्नेहांकित
श्रीमती चेतना सिन्हा
अध्यक्षा

# चालू वर्षातील घडामोडी

कष्टकरी महिलेला अगदी कमीत कमी रकमेची बचत करता यावी म्हणून सुरु झालेली माण देशी बँक आता सातासमुद्रापलिकडे जाऊन पोहचली आहे. महिलांना आत्मविश्वास मिळून देत त्यांना बिझनेस वुमन बनविणेपर्यंतची माण देशीची वाटचाल सर्व क्षितीजे पार करुन गेली आहे.

२०१४-१५ ची कौतुकाची बाब म्हणजे माण देशी बँकेने 'डाटाव्हिजन कोअर सॉफ्टवेअर सोल्युशन प्रा.लि.पुणे' आणि 'एनआयआयटी टेक्नॉलॉजीज् लि. नॉएडा', यांच्या सहकार्याने कोअर बँकिंग प्रणाली अवलंबिली असून आता ग्राहकांना जलदरित्या सर्व बँकिंग सुविधांचा लाभ मिळणार आहे. तसेच आरटीजीएस व एनईएफटी या सुविधा देखील माण देशी बँक यस बँकेच्या सहकार्याने सुरु करीत आहे. जेणे करुन खातेदारांना इलेक्ट्रॉनिकली एका बँकेतून दुसऱ्या बँकेमध्ये फंड ट्रान्सफर करणे शक्य होणार आहे. लवकरच 'सर्वत्र' टेक्नॉलॉजीच्या सहयोगाने माण देशी बँक रुपे डेबीट कार्डची सुविधा आपल्या ग्राहकांना उपलब्ध करुन देणार आहे. या सुविधेमुळे ग्राहकांनी केलेल्या प्रत्येक व्यवहाराची माहिती एसएमएस अलर्टद्वारे मिळणार आहे. माण देशीने २०१४-१५ मध्ये राष्ट्रीय पातळीवर उतुंग झेप घेतली आहे.

सन २०१४ मध्ये श्रीमती चेतना सिन्हा, यांना भारत सरकार, वित्त मंत्रालयातर्फे सामाजिक व आर्थिक कल्याण, राष्ट्रीय समिती सदस्य म्हणून नामांकीत करण्यात आले. राष्ट्रीय समिती, कोणत्याही संस्थांचे पात्र प्रकल्प अथवा योजना सार्वजनिक, सामाजिक-आर्थिक विकासासाठी पार पाडण्याच्या उद्दिष्ठाने मान्यता देते तसेच कोणत्याही कंपनीच्या अथवा संस्थेच्या केंद्र सरकार निगडीत प्रकल्प आणि योजना यांना शिफारस देते.
महिला सक्षमीकरणामध्ये महान योगदान असल्याकारणाने श्रीमती चेतना सिन्हा यांनी महिला व बालविकास मंत्रालय भारत तर्फे राष्ट्रीय महिला कोष कार्यकारी मंडळावर सदस्य म्हणून २० नोव्हेंबर २०१४ रोजी नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रीय महिला कोषचा उद्देश गरीब आणि गरजू महिलांची सामाजिक - आर्थिक उन्नती व व्यवसाय करणाऱ्या महिलांना कर्जवाटप करणे हा होय. केंद्र सरकारने राष्ट्रीय महिला कोष साठी ३०० कोटी रुपयांचा निधी वर्ग केला असून या निधीचा वापर योग्य व गरजू व्यवसायिक महिलांसाठी करण्यात येणार आहे.

श्वॅब फाऊंडेशन फॉर सोशियल आंत्रप्रिन्युएअरशिप या जागतिक स्तरावरील संस्थेमध्ये श्रीमती चेतना सिन्हा या सभासद झाल्या आहेत. श्वॅब फाऊंडेशन ही वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमशी संलग्न संस्था आहे. सन २०१४-१५ मध्ये श्रीमती चेतना सिन्हा यांना वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमतर्फे भरविण्यात आलेल्या विविध परिषदांमध्ये इकॉनॉमिक फोरम, सप्टेंबर २०१४ तैन्जिन चायना येथिल वार्षिक सभा, नोव्हेंबर २०१४ इंडिया इकॉनॉमिक समिट न्यू दिल्ली व जानेवारी २०१५ दावोस स्वित्झरलॅन्ड येथे सामाजिक उद्योजकांची वार्षिक सभा अशा विविध परिषदांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त हार्वर्ड केनेडी स्कुल, अमेरिका तर्फे आयोजित कार्यकारी शिक्षण अभ्यासक्रमासाठी मार्च २०१५ मध्ये श्रीमती चेतना सिन्हा यांची निवड झाली.

## हिसाब, हिम्मत आणि हुन्नर या माध्यमातून ग्रामीण महिला सबलीकरण:-

माण देशी चे ध्येय 'माण देशी उद्योजिका' घडविणे. हे माण देशी बँकेमार्फत महिला उद्योजिकांना भांडवल व फाऊंडेशन मार्फत व्यवसाय प्रशिक्षण देवून साध्य करते. संपूर्ण भारतामध्ये हा दूहेरी संगमाचा (घरपोच भांडवल व व्यवसाय प्रशिक्षण) लाभ मिळवून देणारे माण देशी मॉडेल हे एकमेव मॉडेल आहे.

## रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या अधिकाऱ्यांची माणदेशी बँकेस भेट:-

१९ सप्टेंबर २०१४ रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या अधिकाऱ्यांनी माण देशी बँक, शाखा सातारा येथे भेट

देवून गट कर्ज वाटप, आठवड्याबाजारात व्यवसाय करणाऱ्या महिलांना कर्ज वाटप या योजनांची माहिती घेवून माण देशी बँकेच्या लाभार्थी महिलांशी चर्चा केली. माण देशी बँक ''फायनान्शियल इन्क्लुजन'' साठी तिर्थस्थान असून आठवडा बाजारात विक्री करणाऱ्या महिलांसाठी कॅश क्रेडीटची सुविधा उपलब्ध करुन देणारी पहिली बँक आहे. असे गौरवोद्‌गार रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांनी भेटीप्रसंगी काढले.

माण देशी महिला बँकेने नवीनच सुरु केलेल्या, आठवड्या बाजारात व्यवसाय करणाऱ्या महिलांना जागेवरच कर्ज उपलब्ध करुन दिले जाते. या योजनेमुळे महिलांना आता सावकाराकडे जाण्याची गरज भासत नाही. बँकेद्वारे गरीब व गरजू महिलांना व्यवसायासाठी भांडवल उपलब्ध करुन दिले जाते. तर माण देशी बँकेची संलग्न संस्था माण देशी फाऊंडेशनद्वारे व्यवसायिक प्रशिक्षण देण्यात येते. सन २०१४ मध्ये सुरु झालेल्या या योजनेचा फायदा १५०० महिलांना झाला आहे.

## माण देशी उद्योगिनी व माण देशी चेंबर ऑफ कॉमर्स:-

घरपोच भांडवलाबरोबर, घरपोच व्यवसाय प्रशिक्षण देवून यशस्वी उद्योजिका घडविणे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून माण देशीने बँक, व्यवसाय शाळा(माण देशी उद्योगिनी) फिरते व्यवसाय प्रशिक्षण केंद्र (मोबाईल बस) आणि चेंबर ऑफ कॉमर्सची स्थापना केली. सध्या उद्योगिनीच्या ७ शाखा असून चेंबर ऑफ कॉमर्सच्या ३ शाखा आहेत. १,५०,००० महिलांनी व्यवसाय प्रशिक्षणाचा लाभ घेवून आपले व्यवसाय यशस्वी केले आहेत. ज्या महिला व्यवसाय शाळेत येवून प्रशिक्षण घेवू शकत नाही अशा महिलांसाठी ''फिरती व्यवसाय शाळा'' काढली आहे. माण देशी चेंबर ऑफ कॉमर्स ची सुरवात करुन ग्रामीण भागातील महिला उद्योजिकांना व्यवसाय विषयी मार्गदर्शन, धोरणात्मक सल्ला नवीन कल्पना व माहिती देण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. महिलांच्या सोयीसाठी ''टोल फ्री'' नंबर (१८००२१२२११२) ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सन २०१४-१५ मध्ये माण देशी उद्योगिनीने आपल्या कार्याचा विस्तार लातूर व रत्नागिरी जिल्हयामध्ये करुन त्या भागातील महिलांना घरपोच व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ देणेत येत आहे. ''पुरस्कार देवून माण देशीने माझी समाजात ओळख आणि अस्तित्व निर्माण केले'' हे उद्‌गार आहेत. एका माण देशी उद्योजिकाचे महिला दिनाचे औचित्य साधून ८ मार्च २०१५ रोजी माण देशी संस्थेशी संलग्न राहून शुन्यातून आपले वेगळे अस्तित्व निर्माण केलेल्या १४ महिलांना ''माण देशी उद्योजिका पुरस्कार'' देवून सन्मानित करण्यात आले.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ , नाशिक अंतर्गत अभ्यास केंद्र-

शिक्षणापासून वंचित राहिलेल्यांना स्थानिक पातळीवर शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी या हेतूने माण देशी फाऊंडेशनने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अभ्यास केंद्र सुरू केले त्यामुळे माण,खटाव, माळशिरस व आटपाडी या भागात महिलांना शिक्षणाचे नविन दालनच उपलब्ध झाले. यावर्षी माण देशी फाऊंडेशन आभ्यास केंद्रातील एकूण २३ महिलांनी पदवी अभ्यासक्रम पूर्ण केला असून त्यापैकी १३ महिलांनी बी.ए. पदवीधर होण्याचा बहूमान मिळवला आहे.माण देशी फाऊंडेशन अभ्यास केंद्रामध्ये सन २०११-१२ = ६५,२०१२-१३= १२३, २०१३-१४ =१७०,२०१४-१५= १८१ विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले आहेत. १००% निकालाची परंपरा माण देशीने सतत राखून ठेवली आहे . शिवाय सतत विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढत असून माण देशी प्रतिवर्षी पाच विद्यार्थी दत्तक घेणार आहेत. त्याच बरोबर गुणवंत विद्यार्थ्यांचे पुढील शिक्षण माण देशी करणार आहे. शैक्षणिक सहल, गरिब विद्यार्थी सहाय्य निधी, स्कॉलरशिप या योजनांचा लाभ या अभ्यास केंद्रातील विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

## माण देशी चॅम्पियन क्रिडा संकुल म्हसवड :-

माण देशी फाऊंडेशन मार्फत माण देशी चॅम्पियन क्रीडा संकुलचा १७ डिसेंबर २०१० रोजी ४०० मीटरचा ट्रक बनविण्यात आला आहे. दुष्काळी ग्रामीण भागातील व गरजू मुली व मुलांना शारीरिक मानसिक, बौध्दिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी माण देशी फाऊंडेशनने उचललेले पाऊल आहे. विविध खेळांच्या माध्यमातून त्यांची चांगल्या प्रकारे वाढ, विकास व प्रगती होत असून खेळाडूंना खेळाविषयी माहिती मिळाल्यामुळे विविध खेळामध्ये ते प्राविण्य मिळवित आहे. माण देशी क्रीडा सकुल मध्ये उन्हाळी शिबीर, मिनी मॅरेथॉन, क्रीडा प्रबोधिनी कॅम्प, क्रिकेट ,बेसबॉल विविध मैदानी स्पर्धांचे नियोजन व आयोजन करण्यात येते. माण देशी संकुल मुळे पोलिस, आर्मी इत्यादी मध्ये खेळाडू भरती झालेले आहेत. सन २०१२ मध्ये क्रीडा प्रबोधिनी सातारा येथे एकुण खेळाडू १६२ पैकी २८ खेळाडू माण तालुक्यातील आहे. ते विविध क्रीडा प्रबोधिनीमध्ये प्रशिक्षण घेत आहेत. सन २०१४- १५ मध्ये एकूण सातारा जिल्हा क्रीडा प्रबोधिनीमध्ये ४७ पैकी ३ माण तालुक्यातील खेळाडूंची निवड झालेली आहे. माण देशी क्रीडा संकुल मध्ये सकाळ सत्र ६ ते ९ व दुपार सत्र ३ ते ६ या वेळेत विविध खेळाविषयी प्रशिक्षण देण्यात येते.खेळांडूना मोफत पौष्टिक आहार दिला जातो.

## माण देशी महोत्सवात माण देशीने बलुतेदारांना तारले :-

ज्या माण देशी महोत्सवाची सातारा जिल्हा चातकासारखी वाट पहात असतो त्या महोत्सवाचे आयोजन ६ मार्च ते १० मार्च, २०१५ दरम्यान सातारा शहरामध्ये करण्यात आले होते. या वर्षीची महोत्सवाची विशेषत: म्हणजे ज्या ''बारा बलुतेदारांचा'' समाजाला विसर पडला आहे त्यांना एका छताखाली आणून नव्या पिढीला त्यांच्या कलाकुसरीची माहिती व्हावी या उद्देशाने बारा बलुतेदार यांच्या प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. माण देशीच्या कलेची आणि श्रमाची कदर व्हावी असा उद्देश यामागे होता. याशिवाय महोत्सवात नामांकित मान्यवरांचे स्वयंरोजगार प्रशिक्षण सत्र, परिसंवाद, चर्चासत्र, उत्पादित वस्तूंचे प्रदर्शन व वापरासंबंधी कृतिसत्र इत्यादीची माहिती सातारकरांना अनुभवता आली. महोत्सवामध्ये ५ दिवसांत १७० स्टॉलच्या माध्यमातून सुमारे एक कोटींची उलाढाल झाली.

## माणच्या माळावर हरितक्रांती :-

माण तालुक्यातील शेतीच्या पाण्याचा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा सोडविण्याचा माण देशीचा प्रयत्न यशस्वी ठरला. २०१३-१४ मध्ये माण देशीने शिरताव, बनगरवाडी, पुळकोटी, गंगोती मणकर्णवाडी आणि बोनेवाडी येथे ७ बंधारे बांधले. माण देशी फाऊंडेशन निर्मित सर्व बंधाऱ्याचे कृषी विभागाकडून मूल्यांकन करण्यात आले. कृषी विभागाने सादर केलेल्या अहवालामधून असे लक्षात आले की वरील नमूद केलेल्या बंधाऱ्यामुळे ९२ विहीरींच्या पाण्याच्या पातळीमध्ये व १४० हेक्टर जमिनीच्या पाणी पाझरण्याच्या पातळीत वाढ झालेली आहे. याशिवाय सर्वात महत्वाचे म्हणजे १-२ पिके घेणारा शेतकरीवर्ग मका, कापूस, शेंगदाणा, कांदा व डाळींब ही पिके यशस्वीरित्या घेवू लागला आहे आणि विशेष करुन शेंगदाणा, मका अणि कांदा या पिकांच्या उत्पादनामध्ये भरघोस वाझ झालेली आहे. यामुळे इतर शेतकरी बांधवांच्या आशा पल्लवीत झाल्या व त्यांनी आमचा पिण्याचा व शेतीच्या पाण्याचा प्रश्न सोडवा अशी माण देशीस विनंती केली. त्यांच्या विनंतीस मान देवून माण देशी फाऊंडेशनने २०१५ मध्ये माणगंगा नदीवर बंधारे बांधण्याचे कार्य हाती घेत आहे. बंधारे बांधण्याचे कामी एचएसबीसी आणि बृहद भारतीय समाज या दोन संस्थांचे विशेष सहकार्य लाभले.

## माण देशी तरंग वाहिनी म्हसवड (कम्युनिटी रेडिओ स्टेशन):-

माण देशी तरंग वाहिनी कम्युनिटी केंद्रामार्फत २०१५ हे वर्ष महिला श्रोता वर्ष म्हणून साजरे होत आहे. त्यानिमित्ताने महिलांचे कार्यक्रम व्याख्यान, मॅचींग स्पर्धा, मोफत आरोग्य शिबीरे घेण्यात आली. ऑस्टरनेटीव्ह डेव्हल्पमेंट नवी दिल्ली, यांच्या सहकार्यातून माण देशी तरंग वाहिनीने शेतकऱ्यांसाठी वातावरणातील बदल आणि कमी पाण्यावर शेती व कमी कालावधीत पीक उत्पादने आदि रेडिओ कार्यक्रमांची निर्मीती केली. ऑयडोसीन मिडिया कंबाईन फरिदाबाद, या संस्थेच्या सहकार्यातून ''शासन आपल्या दारी'' या नावाने २६ रेडिओ कार्यक्रमांची निर्मिती करण्याचे कार्य चालू आहे. तसेच केंद्रीय मंत्रालयाच्या DAVP विभागामार्फत केंद्र सरकारच्या जाहिराती प्रसारित करण्यात येत आहेत. प्रश्न आमचा उत्तर तुमचे या कार्यक्रमास नागरीकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. कौतुकाची बाब म्हणजे जानेवारी २०१५ पासून रेडिओ केंद्रातर्फे ईमासिक वार्तापत्राची सुविधा सुरु करण्यात आली आहे.

## शालेय मुलींना ''सायकल वाटप'' कार्यक्रम :-

महिला सबलीकरण क्षेत्रात अग्रेसर असणारी माण देशी ग्रामीण भागातील मुलींना देखील बळ देत आहे. माण देशीच्या माध्यमातून सन २०१५ मध्ये एकूण १५० शाळकरी मुलींना मोफत सायकलीचे वाटप करण्यात आले. या मुली पायी ३-४ किमी शाळेत जात होत्या. सायकली मिळाल्यामुळे त्या मुलींचा वेळ वाचणार आहे जो वेळ त्या अभ्यासामध्ये व इतर कला-कौशल्यामध्ये देवू शकणार आहेत. त्यांचे शिक्षण अर्धवट न राहता त्या उच्च शिक्षणाचा लाभ घेवून त्यांची भविष्यातील स्वप्ने साकार करु शकतील.

## पर्यावरण पूरक पाणी पुनर्वापर प्रकल्प:-

राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाने पर्यावरण पूरक पाणी पुनर्वापर प्रकल्प विकसित करण्यासाठी निधी दिला(ऑक्टो.२०१४) या प्रकल्पाअंतर्गत सर्वेक्षण व तंत्रज्ञान निर्मितीचे काम भारतीय प्रौद्योगिकी संस्थान मुंबई यांच्या मदतीने चालू झाले आहे. म्हसवड नगरपरिषद व माण देशी फाऊंडेशन मधील महिलांचा गटही या प्रकल्पात महत्वाची भूमिका पार पाडत आहे. म्हसवड मधील सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा उपयोग चारा निर्मिती व तहानलेल्या पशुंसाठी पिण्यायोग्य पाण्यासाठी करुन माण नदीतील प्रदुषणाला आळा घालण्याचा अभिनव प्रयोग या प्रकल्पाद्वारे करण्याचा प्रयत्न आहे.

## माण देशीची राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय भरारी:-

एचएसबीसी, ॲक्सेंचर, हिन्दुस्थान युनिलिव्हर लि., युनिसेफ, एडिलगीव्ह फाऊंडेशन, राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग महाराष्ट्र शासन, राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ, कॉमन वेल्थ ऑफ लर्निंग, जीआयझेड, चेरी ब्लेअर फाऊंडेशन, व्हिटोल फाऊंडेशन, अगरवाल फाऊंडेशन, आदि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहकार्याने माण देशी नवनवीन उपक्रम राबवित आहे.

## पुरस्कार व ओळख :-

* माण देशीच्या रोल मॉडेल सौ. सुरेखा काळेल व सौ. कांचन भगत यांनी ''जागृती यात्रेसोबत'' संपूर्ण भारतभर अभ्यासदौरा केला. जागृती यात्रा ही १५ दिवसांचा ८००० किलोमीटरचा प्रवास मुंबईहुन सुरु होवून दिल्ली-विशाखापट्टम-चेन्नई-बेंगलोर-मुंबई अशी राष्ट्रीय रेल्वे सफर आहे. या यात्रेमध्ये भारतातील लहान शहरे व गावांमधील हजारो अर्जामधून ४५० तरुण वर्गाची निवड होते. देशातील सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रात रोल मॉडेल्स असलेले व ज्यांनी हजारो लोकांच्या जीवनात बदल घडवून आणले आहेत अशा संस्थांना/व्यक्तींना भेटी देणे, माहिती घेणे एकमेकांच्या अनुभवातून शिकणे असा या महत्वाकांक्षी यात्रेचा उद्देश असतो.

* माण देशी बँकेस पश्चिम महाराष्ट्र महिला विभागातून वार्षिक अहवाल स्पर्धा प्रथम क्रमांक पुरस्कार सहकारमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते एप्रिल २०१५ मध्ये प्रदान करण्यात आला. बँकिंग क्षेत्रात ग्रामीण भागात वेगळी ओळख निर्माण केलेबद्दल हा पुरस्कार देण्यात आला.

* पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या पुरस्काराने श्रीमती चेतना सिन्हा यांना ना.वर्षा गायकवाड यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

* नागरी सहकारी बँक अंतर्गत प्रामुख्याने ग्रामीण भागातील वंचित लोकांपर्यंत बँकिंग सेवा पोचविण्याबाबत महत्वपूर्ण भूमिका बलावल्याबद्दलच्या कार्याची दखल घेवून श्रीमती चेतना सिन्हा यांना बँकिंग फायनान्स सर्व्हिसेस अॅन्ड इन्शुरन्स (बीएफएसआय) आयोजित शिखर परिषदेत फेब्रुवारी २०१५ मध्ये सन्मानित करण्यात आले.

* ब्रुकिंग संस्था, अमेरिकाचे अध्यक्ष, संचालक मंडळ, आंतरराष्ट्रीय परिषदेचे सल्लागार नोव्हेंबर २०१४ मध्ये भारत भेटीस आले व त्यावेळी त्यांनी माण देशी महिलांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली . ५ नोव्हेंबर २०१४ रोजी हॉटेल ताज पॅलेस, मुंबई मध्ये ब्रुकिंग्ज या संस्थेने माण देशी महिलांसाठी संम्मेलन आयोजित केले व माण देशी महिलांना संम्मेलनामध्ये व्यासपीठावर जागा देवून त्यांचा सन्मान केला तसेच त्यांचे अनुभव सादर करण्याची संधी दिली, ''ग्रामीण भागातील महिलांना योग्य मार्गदर्शन, प्रशिक्षण व आर्थिक सहाय्य देवून उद्योजिका बनवण्याचा माण देशीचा उपक्रम स्तुत्य व आदर्शवत असल्याचे मत ब्रुकिंग संस्था, अध्यक्ष स्ट्रोब टॅलबर्ट यांनी कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले.

* १४ जुलै २०१४ रोजी चेरी ब्लेअर फाऊंडेशन, लंडन आयोजित कार्यक्रमास श्रीमती चेतना सिन्हा यांना माण देशी मॉडेल सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये भारतातील गुंतवणूकदार व उद्योजक वर्गाचा समावेश होता.

* ६ ऑगस्ट २०१५ रोजी एडिलगिव्ह फाऊंडेशन, मुंबई ने माण देशीस आपल्या कार्याचे सादरीकरण करणेसाठी आमंत्रित केले आहे. माण देशी ''हिसाब, हिम्मत आणि हुन्नर या माध्यमातून ग्रामिण महिलांचे सबलीकरण '' कशा प्रकारे करते यासाठी माण देशी महिलांना देखील त्यांचे अनुभव कथन करण्यासाठी आमंत्रित केले गेले आहे.

* ब्रॅक(बांगलादेश रुरल अॅडव्हान्समेंट कमिटी) ही संस्था दरवर्षी ''विकासाच्या सिमा वृध्दिंगत करणे '' यासंकल्पनेखाली ''फ्रुगल इनोव्हेशन फोरम भरविते. यावर्षी २२ ते २४ मार्च दरम्यान ब्रॅक या संस्थेने बांगलादेश येथे परिषद भरविली होती. या परिषदेमध्ये माण देशी मॉडेल सादरीकरणासाठी प्रशासन अधिकारी वनिता शिंदे यांना ब्रॅकतर्फे निमंत्रित करण्यात आले.

* ब्रिटीश कौन्सिल विभाग, ब्रिटीश हाय कमिशन, नवी दिल्ली तर्फे ''तरुण महिलांसाठी सामाजिक उद्योजिकता विकास कार्यक्रम'' चे आयोजन इंडियन इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट, कोझिकोडे, केरळ येथे केले होते. या कार्यक्रमासाठी संपूर्ण भारतातून २४ प्रशिक्षकांची निवड करण्यात आली होती ज्यामध्ये माण देशी तर्फे सौ. वनिता शिंदे व सौ. राजश्री रासकर यांचा समावेश होता.

* ८ मार्च २०१५ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून जगपरिवर्तन घडवून आणणाऱ्या १५ महिलांमध्ये श्रीमती चेतना सिन्हा यांचा समावेश वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम तर्फे करण्यात आला.

## माण देशी इंटरनशिप प्रोग्राम :-

आतापर्यंत येल युनिव्हर्सिटी, पोर्टलॅण्ड युनिव्हर्सिटी, हॉर्वर्ड, साईस, कोलंबिया, मिचीगन, बर्कले युनिव्हर्सिटी जॉर्जटाऊन, एस. पी. जेन इन्स्टिटयुट मुंबई, युनिव्हर्सिटी ऑफ व्हिक्टोरिया, डोएच बँक अशा विविध युनिव्हर्सिटीद्वारे ११० विद्यार्थ्यांनी म्हसवड येथे येवून माण देशीच्या उपक्रमांची माहिती घेतली आहे.

# १८ वा वार्षिक अहवाल सन २०१४-१५

## भागभांडवल :-

बँकेचे अधिकृत भागभांडवल रु. ७ कोटीचे आहे. वर्ष अखेरीस रु. ४७०.०० लाख एवढे जमा झाले आहे. या वर्षात भागभांड़वलात रु. ८५.३३ लाख इतकी वाढ झालेली असून ही वाढ २२.१८ % एवढी आहे. वर्षाअखेर एकूण ५४०४ नवीन सभासद झाले तसेच मृत्यू राजीनामा इत्यादीमुळे ३६५ सभासद कमी झाले. त्यामुळे वर्षाअखेर एकूण सभासद संख्या २२६९९ झाली आहे.

## गंगाजळी व निधी :-

मागील वर्षाअखेर गंगाजळीसह इतर निधी रु. ८५.११ लाख होती अहवाल वर्षात त्यात रु. ४२.३८ ने वाढ होऊन अहवालवर्षा अखेर गंगाजळी, थकव्याज निधी,राखीव निधीची रक्कम रु. १२७.४९ लाख इतकी झाली आहे. या वर्षात वाढीचे शेकडा प्रमाण ४९.७९ % इतके आहे.

## ठेवी व विमा संरक्षण :-

मार्च २०१४ च्या ठेवी रु. ६३९८.०० लाखावरुन मार्च २०१५ अखेर रु. ७६३३.२९ लाख एवढ्या झाल्या आहेत ही वाढ रु. १२३५.२९ इतकी असून, ठेव वाढीचे प्रमाण १९.३१% आहे. या वाढत्या व बदलत्या स्पर्धेत ठेव वाढी बरोबर नफा क्षमता वाढविणे हे ही महत्वाचे आहे त्यामुळे ठेवीच्या व्याजावरील खर्चाचे प्रमाण विचारात घेता ठेवीवरील व्याज दर कमी करावे लागले तरीही आपण एवढ्या ठेवी गोळा केल्या. सभासदांचा,ठेवीदारांचा बँकेवरील विश्वास स्पष्ट आहे सर्व ठेवी डिपॉझिट इन्श्युरन्स आणि क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन अंतर्गत सुरक्षित आहेत. त्यांची दर सहामाही विम्याच्या हप्त्याची रक्कम बँक भरते.

## कर्ज :-

गतवर्षी येणे कर्ज रु. ३९५०.३७ लाख इतके होते या वर्षी त्या मध्ये रु.१३६८.११ लाख एवढ्या रकमेची वाढ झालेली आहे. एकूण कर्ज मार्च २०१५ अखेर ५३१८.४८ लाख. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकाप्रमाणे योग्य तारणी कर्ज वाटपाबद्दल केलेल्या मार्गदर्शना प्रमाणे कर्जवाटप करणे आवश्यक असलेने,चालू वर्षात आम्ही कर्ज प्रकारात वाढ करुन नवीन कल्पना आपल्यापुढे ठेवणार आहोत, स्थानिक लोकांना कर्ज उपलब्ध करुन देण्याची योजना राबविणार आहोत, बँकेचे ठेवीदारांशी, खातेदारांशी, कर्जदारांशी नेहमी सलोख्याचे संबंध असावेत म्हणून त्यात आम्ही नेहमी भर घालतो.

## अग्रक्रम क्षेत्रात कर्ज :-

भारतीय रिझर्व बँक धोरणाप्रमाणे एकूण कर्जाच्या ६०% कर्ज अग्रक्रम क्षेत्रास असावे. आपल्या बँकेत २०१४-२०१५ सालात सुद्धा अग्रक्रम क्षेत्रास ९०.९९% कर्जवाटप केलेले आहे. ही आपली अभिमानाची बाब आहे. तसेच दुर्बल घटकांना सुद्धा ८९.१५% कर्जवाटप केले आहे.

## थकबाकी व कर्जवसुली :-

बँकेच्या आर्थिक उन्नतीमध्ये कर्जवाटप व त्यावरील व्याजाची व हप्त्यांची परिणामकारक वसुलीचा फार मोठा वाटा आहे. त्या दृष्टिने बँकेने सतत पाठपुरवठा केल्यामुळे अहवाल वर्षात थकबाकी चे प्रमाण नियंत्रीत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे त्यामुळे थकबाकीचे प्रमाण २.७६% इतके आहे व वसुली ९७.२४% झाली आहे. व NPA ०.४८% आहे.

## संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे :-

बँकेच्या एकाही संचालकाकडे बँकेचे कर्ज नाही.

## नफा वाटणी :-

या वर्षाच्या नफ्याची वाटणी खालील प्रमाणे सुचविण्यात येत आहे.

| चालू सालचा नफा ₹ | सरासरी प्रमाण | ५१४७००८.६९ |
|---|---|---|
| राखीव निधी | ५०% | २५७३५०४.३५ |
| इमारत निधी | ४५% | २३१६१५३.९१ |
| निवडणुक निधी | ५% | २५७३५०.४३ |
| एकूण | १०० % | ५१४७००८.६९ |

## शाखा विस्तार :-

बँकेला सातारा, सोलापूर, सांगली, रत्नागिरी, पुणे, कोल्हापूर व रायगड या सात जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्राची मान्यता मिळालेली आहे. भविष्यात बँक या सात जिल्ह्यांत शाखांचे विस्तारीकरण करणार आहे. बँक शाखा विस्तारासाठी RBI ला प्रस्ताव पाठविणार आहे.

## सभासदांची वर्गवारी:-

महाराष्ट्रातील मागासवर्गीय महिलांना एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देणारी आपली पहिलीच महिला बँक आहे.

१) मागासवर्गीय - २८% २) ओ.बी.सी. - २५% ३) एन्. टी. २१% ४) ओपन - २६%

## गुंतवणूक:-

बँकेने दि. ३१/३/२०१५ या वर्षात रु. २२४१.४७ लाख इतकी गुंतवणूक केलेली आहे. सरकारी रोखेमध्ये गुंतवणूक १६४४.३९ लाख व इतर बँकेमध्ये ५९७.०८ लाख गुंतवणूक केलेली आहे.

## सोनेतारण कर्ज :-

बँकेने दि. ११/८/१९९७ पासून सोनेतारण कर्ज योजना बँकेच्या सर्व शाखांमध्ये सुरु केलेली असून सदर योजनेतून एकूण ३२१.०७ लाख रुपये इतके कर्जवाटप करणेत आले आहे.

## अंतर्गत तपासणी -

बँकेचे ३१/३/२०१५ अखेर संपणाऱ्या सहकारी वर्षासाठी अंतर्गत लेखापरिक्षण मे. जाधव तानाजीराव आणि कं. चार्टर्ड अकौटंटस् ,कराड यांनी केले असुन त्यांनी बँकेस बहुमोल सुचना व मार्गदर्शन केले आहे.

**प्रशिक्षण कार्यक्रम:-**

दरवर्षीप्रमाणे सन २०१४-१५ मध्ये माण देशी बँकेद्वारे कर्मचाऱ्यांना कर्ज, वसुली गट कर्ज वाटप, कॅशिअर, बँकिंग सॉफ्टवेअर संदर्भात प्रशिक्षण देण्यात आले.

| | प्रशिक्षण विषय | प्रशिक्षणार्थी | प्रशिक्षक |
|---|---|---|---|
| १. | जोखीम व्यवस्थापन आणि संचालकांची भूमिका | शाखाधिकारी व संचालक | सातारा जिल्हा नागरी सह. बँकस् असोसिएशन लिमिटेड |
| २. | क्रेडिट अॅप्रायझल सिस्टीम | शाखाधिकारी व कर्ज विभाग अधिकारी | सातारा जिल्हा नागरी सह. बँकस् असोसिएशन लिमिटेड |
| ३. | रोखीचे व्यवस्थापन, चेक क्लिअरिंग व एनपीए | कॅशिअर व वसुली अधिकारी | सातारा जिल्हा नागरी सह. बँकस् असोसिएशन लिमिटेड |
| ४. | ९७ वी घटना दुरुस्ती व नवीन सह. कायद्यातील तरतुद, के वाय सी नॉर्म्स व अॅन्टीमनी लॉन्डरींग, अॅक्टमधील महत्वाच्या तरतुदी, नागरी सहकारी बँकांमधील बदलती कार्यपद्धती, बँकिंग सोल्युशन्स, सहकारी बँकामधील मार्केटिंगचे महत्व, कर्जवाटप करताना घ्यावयाची दक्षता | वरिष्ठ अधिकारी | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सातारा यांच्यामार्फत गुलाबराव पाटील प्रशिक्षण केंद्र सांगली |
| ५. | गुंतवणूकीचा पोर्टफोलिओ संदर्भात व बँकेचा नफा वाढविण्यासंदर्भात व्यवस्थापन | लेखनिक | डॉ. विठ्ठलराव विखे पाटील इन्स्टीटयुशन ऑफ नॅशनल काऊनसिल फॉर को ऑपरेटिव्ह ट्रेनिंग,पुणे |
| ६. | क्रेडिट रिस्क आणि त्यावरील समस्या व कर्ज व्यवस्थापन कार्यशाळा | सिनिअर अकौंटंट | एस.बी.बी.एन कॅपीटल प्लस एक्सचेंज |
| ७. | गुंतवणूक व्यवस्थापन | माण देशी बँक कर्मचारी | सातारा जिल्हा नागरी सह. बँकस् असोसिएशन लिमिटेड |

**अभिनंदन:-**

माण देशातील युवक श्री. विक्रम विरकर, विरकवाडी, श्री. सचिन ओंबासे, वडगांव, श्री. प्रसाद मेनकुदळे, शिंगणापूर यांना युपीएससी परिक्षेत मिळालेल्या यशाबद्दल माण देशी परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन!

*********

**श्रद्धांजली:-**

या वर्षी डॉ. जयंत शहा यांचे अचानक निधन झाले. त्यांनी चांगल्या कामाबद्दल बँकेस सतत शाबासकीच दिली त्यांची आठवण बँकेस सतत राहणार त्यांच्या कुटूंबांच्या वेदनेत आम्ही सहभागी आहोत. माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड चे तज्ञ संचालक श्री. काशिनाथ राऊत यांचे दुख:द निधन झाले त्यांना माण देशी परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली. अहवाल सालात बँकेचे जे ज्ञात, अज्ञात, सभासद, ग्राहक, ठेवीदार, हितचिंतक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ज्या थोर विभूती पंचतत्वात विलीन झाल्या तसेच देशाच्या सीमारक्षणासाठी ज्या शूर जवानांनी आत्मबलिदान केले त्यांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धाजंली.

# लेखापरीक्षण अहवाल

१. आम्ही माणदेशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड या बँकेच्या सोबत जोडलेल्या दि. ३१.०३.२०१५ च्या ताळेबंदाचे व त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या नफा/तोटा पत्रकाचे तसेच सदर आर्थिक पत्रकांचा भाग असणारी महत्वपूर्ण आर्थिक धोरणे व अन्य अनुषंगिक माहिती यांचे लेखापरिक्षण केले आहे. आर्थिक वर्ष १.०४.२०१४ ते ३१.०३.२०१५ या कालावधीच्या आर्थिक पत्रकांमध्ये आम्ही लेखापरिक्षण केलेल्या ७ शाखा व मुख्य कार्यालय यांच्या आर्थिक व्यवहारांचा समावेश आहे.

व्यवस्थापनाची आर्थिक पत्रकांबाबतची जबाबदारी

२. सदरची आर्थिक पत्रके हि बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९, रिझर्व्ह बँकेची मार्गदर्शक तत्वे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० मधील तरतूदीना अनुसरुन बनविण्याची जबाबदारी बँकेच्या व्यवस्थापनाची आहे. सदरच्या जबाबदारीमध्ये आर्थिक पत्रके तयार करताना आवश्यक असणाऱ्या अंतर्गत नियंत्रणासाठीचे नियम तयार करणे, त्यांची अंमलबजावणी करणे व वेळोवेळी त्यामध्ये सुधारणा करणे आदि बाबीचां समावेश होतो की, ज्यामुळे सदरची आर्थिक पत्रके ही कोणत्याही प्रकारच्या गंभीर चुका अथवा दोष विरहित होतील.

लेखापरिक्षकांची जबाबदारी

३. आमची जबाबदारी ही आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाच्या आधारे त्या आर्थिक पत्रकावर मत नोंदविण्याची आहे आम्ही आमचे लेखापरिक्षण हे दि इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकौटंटस ऑफ इंडिया यांनी निर्देशित केलेल्या ऑडिटींग स्टॅन्डर्डस्‌ना तसेच बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा १९६० व रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांना अनुसरुन केलेले आहे. त्या स्टॅन्डर्डनुसार आम्ही आमचे लेखापरिक्षणाचे नियोजन व प्रत्यक्ष लेखापरिक्षण नियोजन व प्रत्यक्ष लेखापरिक्षण अशा पद्धतीने करणे अपेक्षित आहे की, जेणे करुन त्या आर्थिक पत्रकांमध्ये गंभीर स्वरुपाच्या चुका नाहीत, याची रास्त खात्री करुन घेतली जाईल.

४. आर्थिक पत्रकांमधील रक्कमांच्या संदर्भातील व इतर माहितीच्या संदर्भातील पुरावे नमुना तत्वांवर तपासण्याचा अंतर्भाव लेखापरिक्षणामध्ये होता. लेखापरिक्षणाच्या पद्धतीची निवड ही लेखापरिक्षकांचे अनुमान तसेच आर्थिक पत्रकांमध्ये चुका अथवा अफरातफर यामुळे गंभीर दोष निर्माण होण्याच्या शक्यतेची पडताळणी आदी बाबी गृहित धरुन केली जाते. अशा जोखमींची पडताळणी करुन योग्य अशी लेखापरिक्षण पद्धती निवडताना लेखापरिक्षक प्रामुख्याने बँकेने आर्थिक पत्रके तयार करताना अवलंबलेली अंतर्गत नियंत्रण पद्धती विचारात घेतात. लेखापरिक्षणामध्ये, व्यवस्थापनाने वापरलेल्या अकौटींग तत्वाच्या योग्यतेचे मुल्यमापन करणे, व्यवस्थापनाने केलेल्या महत्वाच्या आर्थिक अंदाजाच्या योग्यतेचे मुल्यमापन करणे व आर्थिक पत्रकांच्या सादरीकरणाचे मुल्यमापन करणे याचा सुद्धा समावेश होतो.

५. आमचा विश्वास असा आहे की, आमच्या लेखापरिक्षणा दरम्यान आम्हाला मिळालेले पुरावे आम्हाला आमचे लेखापरिक्षणाबाबतचे मत बनविण्यासाठी यथार्थ आधार मिळवून देतात.

अभिमत

६. आमच्या मते आम्हाला दिलेल्या संपूर्ण माहिती तसेच खुलाशावरुन हे हिशोब, त्या सोबतची टिपण व त्यासोबत जोडलेली परिशिष्ठे आणि आमच्या लेखापरिक्षण अहवालातील मुद्दे यांना अनुसरुन महाराष्ट्र सहकारी संस्थाचा १९६० चा कायदा व त्या खालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी सर्व माहिती देतात तसेच भारतामध्ये सर्वमान्य असणाऱ्या अकौटींग तत्वांचे अनुपालन करतात आणि

अ. ताळेबंदच्या बाबतीत दि. ३१.३.२०१५ च्या बँकेच्या आर्थिक परिस्थितीची आणि

ब. नफा/तोटा पत्रकाच्या बाबतीत या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या मुदतीत बँकेच्या नफ्याची सत्य व रास्त स्थिती दर्शवित आहेत.

७. सदर बँकेचे ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रक हे बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ च्या कलम २९ तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या तरतुदीनां अनुसरुन तयार केले आहेत.

८. परिच्छेद क १ ते ५ मध्ये नमुद केलेल्या लेखापरिक्षण पद्धती आणि मुख्य व शाखा अहवालातील भाग अ ब आणि क मध्ये नमुद केलेल्या शेऱ्यास अनुसरुन तसेच आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे आणि आम्हाला दिलेल्या संपूर्ण माहिती तसेच खुलाशावरुन आणि बँकेने सादर केलेल्या हिशोब व त्यासोबत जोडलेली परिशिष्ठ यांना अनुसरुन आम्ही अहवाल करतो की,

१. आमच्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी, आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत व ते समाधानकारक आहेत.

२. आमच्या दृष्टीपतास आलेले बँकेचे व्यवहार हे बँकेच्या अधिकारक्षेत्रास अधिन राहून केलेले आहेत.

३ लेखापरिक्षणाच्या दृष्टीने शाखांकडून प्राप्त झालेली विवरणे पुरेशी आहेत.

९. आमच्या मते ताळेबंद व नफा तोटा पत्रक हे अकौंटिंग स्टॅन्डर्डस्चे सर्व साधारणपणे योग्य रितीने अनुपालन करतात.

१०. तसेच आम्ही अहवाल करतो की,

१. आम्ही तपासलेला ताळेबंद व नफा/तोटा पत्रक संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकांशी व विवरणाशी जुळत आहेत.

२. आमच्या मते पुस्तकांच्या तपसणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल, त्यावरुन संस्थेने संबंधीत कायद्यानुसार अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य ती हिशोबांची पुस्तके ठेवलेली आहेत.

३. लेखापरिक्षण अहवाल तयार करताना आम्ही लेखापरिक्षण केलेल्या शाखाच्या अहवालांचा परामर्ष घेतला आहे.

४. आर्थिक वर्ष २०१४-१०१५ करिता संस्थेस वर्ग **"अ"** देण्यात आलेला आहे.

के जी बी ॲण्ड जे असोसिएटस् करिता
चार्टर्ड अकौंटंटस्

संतोष खाडे
भागीदार
मेंबरशीप क्र. १०८९२५
फर्म. रजि. क्र. ११४८४९W

स्थळ : कोल्हापूर
दिनांक : १५.०७.२०१५

# बँकेची वैशिष्ट्ये

१. व्यापारी बँकापेक्षा ठेवीवर अर्धा टक्का अधिक व्याज.
२. स्थानिक नेतृत्व आणि व्यवस्थापन
३. व्यक्तीगत जिव्हाळा आणि तत्पर व घरपोच सेवा.
४. ग्रामीण गावातील सभासदांना एजंटची सोय
५. रुपये १ लाख पर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण
६. जेष्ठ नागरीकांच्या ठेवीवर ०.५% अधिक व्याज
७. वीजबीले स्विकारण्याची सोय
८. महिलांसाठी UTI पेन्शन योजना
९. आठवडे बाजार करणाऱ्या महिलांसाठी जागेवरच कर्जाची उपलब्धता.

## ठेवीचे व्याजदर

| | |
|---|---|
| सेव्हिंग्ज ठेव ४% | ३६६ दिवस ते ४५६ दिवस ११% |
| १५ दिवस ते ४५ दिवस ६.५% | ४५७ दिवस ते ५ वर्षापर्यंत १०% |
| ४६ दिवस ते ९० दिवस ७% | दामदिडपट ठेव-४ वर्षे २ महिने १६ दिवस |
| ९१ दिवस ते १८० दिवस ८% | दामदुप्पट ठेव -७ वर्षे २ महिने ११ दिवस |
| १८१ दिवस ते २७४ दिवस ९% | ५ वर्षाच्या पुढे - ९.७५% |

जेष्ठ नागरिक / पतसंस्था ०.५% जादा व्याजदर

## बँकेचा शाखा विस्तार

शाखा म्हसवड फोन: (०२३७३) २७०११९
शाखा वडूज फोन: (०२१६१) २३२४७०
शाखा सातारा फोन: (०२१६२) २३८५२२
शाखा धायरी, पुणे फोन: (०२०) २४६९०३८८
शाखा गोंदावले बु।। फोन: (०२१६५) २५८०१४
शाखा दहिवडी फोन: (०२१६५) २२०३८०
शाखा लोणंद फोन: (०२१६९) २२६०९०

शाखा म्हसवड येथे लॉकर सुविधा उपलब्ध आहे.

## * बँकर्स *

